**द. मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान भूमिगत बोगद्याच्या बांधकामासाठी कार्यकारी समितीची कंत्राटदाराच्या नियुक्तीस मान्यता**

**पूर्व मुक्त मार्गावरील ऑरेंज गेट आणि मरीन ड्राइव्ह दरम्यानचा प्रवास होणार वाहतूकोंडीमुक्त**

**प्रकल्प अंमलबजावनीच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची 276 व्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय**

**मुंबई, १२ सप्टेंबर, २०२३:-** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची 276 वी बैठक शासनाचे मुख्य सचिव श्री. मनोज सौनिक भा. प्र .से., यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से. आणि समितीच्या इतर सदस्यांच्या उपस्थितीत आज पार पडली. बैठकीत मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या विनाव्यत्यय आणि आरामदायक दळणवळणासाठी भूमिगत बोगद्याचे बांधकाम व अन्य तद्नुषंगीक कामे करण्याकरिता मे लार्सन अँड टुब्रो लि. या लघुत्तम निविदाकाराची सर्व करांसहित व तात्पुरत्या रकमेसह असलेला ७७,६५,०९,६६,०००/- इतक्या किंमतीचा देकार स्वीकारण्यास कार्यकारी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

प्राधिकरणामार्फत मुंबई शहराच्या पूर्व किनारपट्टीस समांतर असा मानखुर्द-चेंबूर जोडरस्त्यापासून पी' डिमेलो रस्त्यावरील ऑरेंज गेटपर्यत पूर्व मुक्तमार्ग बांधण्यात आला आहे. या मार्गामुळे दक्षिण मुंबईकडे जलदगतीने वाहतूक करणे शक्य झाले आहे. पूर्व मुक्त मार्गावरील वाहतूक मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ऑरेंज गेट येथे गजबजलेल्या पी'डिमेलो मार्गावर येऊन मिळते, त्यामुळे गर्दीच्या वेळी याठिकाणी वाहनांच्या मोठया प्रमाणात रांगा लागतात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलजवळील पी'डिमेलो मार्गावरील मुख्य पोस्ट ऑफिसच्या चौकात वाहतुकीचे नियमन करणे अवघड होत आहे. मुंबई महापालिकेतर्फे मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीस समांतर किनारा मार्गाच्या कामाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तथापि, मुंबई शहरात पूर्व पश्चिम बाजूस जोडणारी प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्था नसल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो व पर्यायाने इंधन व वेळेची हानी होते. यावर उपाय म्हणून मुंबई शहरातील पूर्व मुक्त मार्गावरील ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह दरम्यान ९.२३ किमी लांबीच्या प्रकल्पाचे बांधकाम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार आहे. ज्यामध्ये६.५१की लांबीचा दुहेरी भूमिगत बोगद्याच्या बांधकामाचा समावेश आहे. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी दरम्यान रस्ते मार्गाने जलद जोडणी उपलब्ध नसल्यामुळे दक्षिण मुंबईच्या शहरी भागाला शहरातील वाहतूक कोंडीसह इतर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या समस्येचे निरसन करण्यासाठी तसेच रस्ते मार्गाने मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी दरम्यान वाहतूक सुविधा पुरवण्यासाठी एमएमआरडीए हा प्रकल्प उभारत आहे. दक्षिण मुंबई शहर परिसरात पूर्व-पश्चिम किनारपट्टीला जोडणारा, त्यासोबतच पूर्व मुक्त मार्गावरून दक्षिण मुंबईतील मंत्रालय, मरीन ड्राईव्ह या दिशेने जलद तसेच सुव्यवस्थित

वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. ज्याच्यामुळे पूर्वमुक्त मार्ग आणि मरीन ड्राईव्ह दरम्यान प्रवास व्यत्ययरहीत तसेच जलदगतीने होणार आहे.

**प्रकल्पाची माहिती**

एकूण ९.२३ किमी लांबीच्या प्रकल्पाच्या बांधकामामध्ये टनेल बोअरींग मशिनच्या मदतीने ६.५१ किमी लांबीच्या भूमिगत बोगद्यांचे बांधकाम करणे, तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने बोगद्यांच्या आतील बाजूस काँक्रिटी अस्तरीकरण करणे, क्रॉस पॅसेजची रचना इत्यादीचा अंर्तभाव आहे. सदरच्या कामात दोन स्वतंत्र बोगदे असून प्रत्येक बोगद्याच्या आतील बाजूचा व्यास ११ मी. आहे. प्रत्येक बोगद्यामध्ये वाहतुकीसाठी २+२ मार्गिका व १+१आपत्कालीन मार्गिका आणि पादचारी मार्ग अशी रचना प्रस्तावित आहे. पूर्व मुक्तमार्ग ऑरेंजगेट येथे वाहनांना उतरण्यासाठी व्हायाडक्ट बांधणे आणि भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूस ओपन कट व पोहोचमार्ग बांधणे इ. कामांचा देखील अंर्तभाव आहे. प्रकल्पाच्या मार्गरेषेच्या डावीकडील बाजूचा भुयारी मार्ग सागरी मार्गाच्या खालून पुढे नेऊन बी. डी. सोमानी चौकाच्या नंतर भू-पृष्ठावर आणावा असे नियोजित आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रस्तावित प्रकल्प हा भूमिगत मेट्रो मार्ग -३ च्या खालून नेण्याचे नियोजित आहे. त्यामुळे भुयारी मार्गाची खोली जमिनीपासून सुमारे ४० मी. पेक्षा अधिक असणार असल्याने मध्यरेल्वे आणि उंच इमारतीच्या पायाचा अडथळा टाळता येणे शक्य होईल. हा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक आहे कारण या प्रकल्पाच्या मार्गरेषेत ऐतिहासिक वारसा स्थळ आहेत. तसेच प्रकल्पाची मार्गरेषा दक्षिण मुंबईसारख्या दाट नागरी वस्तीच्या खालून जात असल्यामुळे याचे बांधकाम काळजीपुर्वक करणे अत्यंत महत्त्वाचे असणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर द. मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यालगत प्रवासाचा वेळ कमी होईल. तसेच मरीन ड्राइव्ह आणि पूर्व मुक्त मार्ग दरम्यान अखंड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होईल. हा प्रकल्प शिवडी-वरळी जोडरस्ता प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, पूर्व मुक्त मार्ग, मुंबई सागरी किनारा मार्ग, वांद्रे - वरळी सी लिंक अशा सर्व प्रकल्पांसाठी पूरक ठरेल.

**"एखाद्या प्रदेशातील प्रगत भक्कम वाहतूक व्यवस्था ही त्या भागातील आर्थिक वाढीसाठी महत्त्वपूर्ण असते. ज्यामुळे त्या भागातील शास्वत आणि विकासात्मक प्रगती ही कित्येक दशकं अबाधित राहते. एमएमआरडीएमार्फत मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगीन विकासासोबत प्रदेशातील वाहतुकीची पायाभूत सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने विविध महत्वकांक्षी प्रकल्प उभारले जात आहेत. हे सर्व प्रकल्प वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने एकमेकांस पूरक ठरतील अशा नियोजनबद्ध पद्धतीने उभारण्यात येत आहेत. ज्यामुळे नागरिकांना प्रदेशातील अंतर्गत वाहतुकीसाठी विविध पर्याय उपलब्ध होणार असून शहरातील एका भागातून दुसऱ्या भागात पोहचणे सुलभ होणार आहे."** असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र.से. म्हणाले.

**MMRDA Approves Construction of Underground Tunnel Connecting East Freeway's Orange Gate to Coastal Road at Marine Drive**

**New Underground Tunnel to Create Seamless Traffic Flow between Eastern Freeway's Orange Gate and Marine Drive**

**Mumbai, September 13, 2023 -** The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has announced a major milestone in improving Mumbai's transportation infrastructure.

MMRDA approved the appointment of Ms. Larson & Toubro Ltd. as the contractor for the construction of an underground tunnel. This tunnel will provide a traffic-free route between the Orange Gate at Eastern Freeway and Marine Drive, enhancing connectivity and reducing travel times.

The Eastern Freeway, connecting Mankhurd to Chembur Junction and Orange Gate on P'Dimello Road, has significantly improved transportation to South Mumbai. However, the increased traffic at Orange Gate has become a challenge for the Mumbai Port Trust and the Main Post Office square on P'Dimello Marg. To address these issues and create a seamless road-based transit system, the MMRDA plans to construct a 9.23 km corridor that will link the Eastern Freeway's Orange Gate to the coastal road at Marine Drive.

The project includes a 6.51 km twin-tube underground tunnel, with each tunnel accommodating 2+2 traffic lanes, 1+1 emergency lanes, and pedestrian walkways. The project entails constructing a viaduct for vehicle access at the Eastern Freeway Orange Gate, open cuts, and access roads on both sides of the corridor. The left-side tunnel will pass beneath the seaway and resurface after B. D. Somani Chowk. This project is planned by considering the safety of underground Mumbai Metro line-3 project. For which the depth of the tunnel will be about 40 m from the ground level, ensuring it doesn't obstruct the central rail or high-rise building foundations. Safety measures are paramount, given the project's proximity to heritage sites and densely populated areas in South Mumbai.

Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner of MMRDA, emphasized the importance of a robust transportation system in driving economic growth and sustainable development. He stated, **"In the Mumbai Metropolitan Region, the MMRDA is spearheading a range of ambitious projects aimed at enhancing the region's transportation infrastructure and fostering overall development. These projects are meticulously planned to complement one another, effectively addressing traffic congestion and providing citizens with convenient transportation options."**

The construction of the underground tunnel is a significant step towards improving connectivity between the east and west coasts of South Mumbai. It will complement other major projects in the region, such as the Sewri-Worli elevated connector, Mumbai Trans Harbor Link, Eastern Freeway, Mumbai Coastal Road Project, and Bandra-Worli Sea Link.

The Mumbai Metropolitan Region Development Authority is responsible for planning, coordinating, and implementing development projects in the Mumbai Metropolitan Region. With a vision to create a sustainable and efficient transportation system, the MMRDA aims to enhance connectivity and promote economic growth in the region.